| CNR No.: MHPU05-000001-2024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | ०६/११/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | – | ०२/०१/२०२४ |
| | निकाल दिनांक | – | ०९/०७/२०२६ |
| | कालावधी | – | वर्षः ०२ महिनेः ०८ दिवसः ०३ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे महानगर पालिका न्यायालय, जि. पुणे**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती एन. एस. सय्यद)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १/२०२४** **निशाणी क्रमांक:३५**

| | |
|---|---|
| फिर्यादचा तपशील | गुन्हा घडल्याची तारीख – २८/०४/२०२३ पुणे महानगरपालिका हद्दीतील, सर्वे नंबर ६१३/६१४ प्लॉट नंबर ११, गंगाधाम ए सहकारी संस्था फेज–२, बंगलो प्लॉट बिबवेवाडी, कोंढवा रोड, पुणे ४११०३७. |
| तक्रारकर्ता | **पुणे महानगरपालिका** तर्फे,<br>श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस<br>हॉर्टीकल्चर मिस्त्री, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे मनपा. |
| फिर्यादी तर्फे सादरकर्ता – विधिज्ञ | श्रीमती अनुराधा पडवळ |
| आरोपी | **श्री. सचिन विनोद गांधी**<br>वयः– ४० वर्ष<br>राहणारः– सर्वे नंबर ६१५, प्लॉट नंबर ११, गंगाधाम ए सहकारी संस्था फेज–२, बंगलो |

| | |
|---|---|
| | प्लॉट बिबवेवाडी, कोंढवा रोड, पुणे ४११०३७. |
| आरोपीकरिता/तर्फे सादरकर्ता – | विधिज्ञ श्री. ए. एस. क्षीरसागर |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली | किती शिक्षा दिली | खटला चालू असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. सचिन विनोद गांधी | अटक नाही. | -- | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१) अन्वये | निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | लागू नाही. |

## फिर्यादीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस | फिर्यादी |
| २. | श्री. सुनिल सरोजभाई शहा | साक्षीदार |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ०९ जुलै, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याचे आरोपांबाबत चालविणेत आला.

**०२.** फिर्यादी पक्षातर्फे असे कथन आहे की, फिर्यादी यांना दिनांक २८/०४/२०२३ रोजी अवैध वृक्षतोडीची माहिती मिळाली. त्यानुसार फिर्यादी श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस यांनी पुणे महानगरपालिका (येथुन पुढे संक्षिप्ततेकरिता 'पुणे मनपा' असे संबोधण्यात येईल) पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर ६१३/६१४ प्लॉट नंबर ११, गंगाधाम ए सहकारी संस्था फेज–२, बंगलो प्लॉट बिबवेवाडी, कोंढवा रोड, पुणे येथे जाऊन पाहणी केली. त्या ठिकाणी आरोपी सचिन विनोद गांधी यांनी खालीलप्रमाणे झाडे विनापरवाना तोड केल्याचे निदर्शनास आले –

| अ. क्र. | वृक्षांची नावे | मध्य वेढी (मीटर) | उंची (मीटर) | अंदाजे वर्षे | झाड/झाडांच्या फांद्या तोडल्याबाबतचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेरू–१ | ०.१५ | ३ | ४ | संदर्भांकित तक्रारी अर्जानुसार व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला नुसार समक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता अनु.क्र.१ ते ५ चे वृक्ष जागेवर दिसून येत नाहीत. |
| २ | फायकस–१ | ०.१५ | १ | २ | |
| ३ | पारिजातक–१ | ०.१५ | ३ | ३ | |
| ४ | ख्रिसमस–१ | ०.१५ | ४ | ५ | |
| ५ | बुच–१ | ०.४० | ६ | ८ | |

**०३.** फिर्यादमध्ये पुढे असे आले आहे की, फिर्यादी श्री. बाळासाहेब कुशाबा

डोळस यांनी घटनास्थळाची पाहणी केली, दिसत्या परिस्थितीचा घटनास्थळ पंचनामा केला, वृक्षतोडीच्या स्थळाचे छायाचित्र काढले आणि त्यानुसार कार्यालयास अहवाल सादर केला. त्यानंतर फिर्यादी पुणे मनपाने चौकशी अंती आरोपीविरूद्ध गुन्हा निष्पन्न झाल्याने वृक्ष प्राधिकरण मार्फत आरोपीस वर नमुद वृक्षतोड केल्यामुळे दोन नोटीस पाठविल्या. सदर नोटीसला आरोपीने खुलासा देखील सादर केला नसल्यामुळे पुणे मनपाने आरोपीविरुध्द प्रस्तुतचा खटला दाखल केला.

**०४.** आरोपीस खटल्यात समन्स काढण्यात आल्यानंतर आरोपी खटल्यात हजर झाले. गुन्ह्याचे दोषारोप आरोपींना मराठीत समजावुन सांगितले, आरोपीस ते समजले. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही. निशाणी क्र.८ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले व त्याचे विनंतीवरुन सदरचा खटला आरोपीविरुध्द पुढे चालविण्यात आला.

**०५.** गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस व मुळ तक्रारदार श्री. सुनिल सरोजभाई शहा यांची साक्ष नोंदविली व कागदोपत्री पुरावा दाखल केला. निशाणी क्र.३३ अन्वये आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१) (ब) अन्वये तपासणी घेण्यात आली. आरोपीने त्याचेविरुध्द सर्व बाबी नाकारल्या व ते निर्दोष असल्याचे सांगितले.

**०६.** उभय पक्षांचा युक्तीवाद, खटल्यातील पुरावा व इतर कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे निर्माण होतात त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत नोंदवित आहे ते येणेप्रमाणेः

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादी पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| | २८/०४/२०२३ रोजी अगर त्या दरम्यान पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्वे नंबर ६१३/६१४ प्लॉट नंबर ११, गंगाधाम ए सहकारी संस्था फेज–२, बंगलो प्लॉट बिबवेवाडी, कोंढवा रोड, पुणे येथे जाऊन पाहणी केली. त्या ठिकाणी आरोपीने वर नमूद वृक्षांची विनापरवाना, अनाधिकृतरित्या तोड केली होती किंवा ते सदर वृक्षतोडीस कारणीभुत झाले होते? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता –**

**०७.** आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता फिर्यादी पक्षाने ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपीने अवैधरित्या वर नमूद वृक्षांची विनापरवाना अनाधिकृतरित्या तोड केली होती व ते **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** चा अन्वयेच्या तरतुदीप्रमाणे शिक्षेस पात्र आहे. आरोपीतर्फे पुरावा देण्यात आलेला नाही.

**०८.** गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी पक्षातर्फे श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस व मुळ तक्रारदार श्री. सुनिल सरोजभाई शहा यांनी त्यांचा पुरावा दिलेला आहे. याशिवाय, तक्रारी अर्ज (नि.१३), घटनास्थळ पंचनामा (नि.१४), घटनास्थळाचे छायाचीत्र, अहवाल(नि.१५), नोटीस(नि.१६ व १७), अधिकार पत्र, सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांनी दिनांक ११.०३.२०२५ रोजी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग झोन ५ यांना दिलेल्या पत्राची प्रत, दिवाणी दावा क्र.१०१८/२०२४

मधील निशाणी ५ वरील आदेश, उद्यान विभाग यांनी दिनांक ०५.०७.२०११ रोजी सुनिल शहा यांना दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व अहवाल (निशाणी २४), बांधकाम मान्यता नकाशा सीसी नंबर २३४५ याची प्रत (निशाणी २२), उद्यान विभाग पुणे मनपा यांच्याकडे केलेले हमीपत्र (निशाणी २३), इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०९. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस यांनी तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक १९.०४.२०२३ रोजी बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय येथे कार्यरत असताना श्री. शहा यांचा तक्रारी अर्ज कार्यालयास प्राप्त झाला होता. त्यानुसार सदर ठिकाणी जाऊन घटनास्थळ पंचनामा निशाण १४ तयार केला. सदर घटनास्थळी ५ वृक्षांची विनापरवाना तोड करण्यात आलेली होती. सदर घटनास्थळवर बांधकाम परवानगी देण्यापुर्वी पुणे महानगरपालिकेची परवानगी घेत असताना त्यामध्ये ५ वृक्षांचा उल्लेख करण्यात आलेला होता व मंजुर नकाशामध्ये देखील सदर ५ झाडे दर्शविण्यात आलेली होती. त्यानंतर सदर घटनेबाबत सविस्तर अहवाल निशाणी १५ तयार करून कार्यालयास सादर केला. कार्यालयास अहवाल सादर केल्यानंतर कार्यालयामार्फत आरोपी यांना दिनांक २८.०४.२०२३ व ०२.०६.२०२३ रोजी दोन नोटीस निशाणी १६ व १७ पाठविण्यात आल्या. सदर नोटीसला आरोपी यांनी खुलासा देखील सादर केला नसल्याने आरोपीविरूद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आली.

१०. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, घटनास्थळ पंचनाम्यामध्ये लिहिलेले झाडांचे वर्णन सन २०१२ मध्ये दिलेल्या एनओसी च्या आधारे लिहिलेले आहे. तसेच घटनास्थळावरील वृक्षतोड झाल्याबाबत लाकूडफाटा अगर त्यासाठी वापरण्यात आलेले साधन याचा उल्लेख

पंचनामा, अहवाल व फिर्याद मध्ये नमूद केलेला नाही. तसेच मुळ तक्रारदार यांनाच पंच क्र.१ म्हणुन घेण्यात आले होते व पंच क्र.२ या पंच क्र.१ यांच्या पत्नी आहेत. मुळ तक्रारदार हेच पुर्वी घटनास्थळावरील जागेचे पुर्वीचे मालक होते. पुढे साक्षीदार मान्य करतात की, घटनास्थळी कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा अगर घटनास्थळाच्या आजुबाजूला राहणाऱ्या व्यक्तींचा जबाब त्यांनी नोंदविलेला नाही. तसेच आरोपीस सदर वृक्षतोडीबाबत नोटीस प्राप्त झालेबाबत पोहोच अगर कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**११.** फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ श्री.सुनिल सरोजभाई शाह यांनी तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, ज्या ठिकाणी वृक्षतोड झाली त्या जागेचे ते पुर्वी मालक होते. सदर जागेत सन २०११ ते २०२२ पर्यंत ते राहात होते. सदर जागेचा दिनांक ३०.०१.२०२२ रोजी बँकेने ताबा घेऊन लिलाव केला होता. सन २००२ साली त्यांना सदर जागेवर बांधकाम करण्याकरीता पुणे महानगरपालिकेतर्फे कमीन्समेंट सर्टफिकीट देण्यात आले होते. सदर ठिकाणी २००२ ते २०११ साली त्यांनी ८ झाडे लावले होते व त्यांचे संवर्धन केलेले होते. त्याबाबत पुणे महानगरपालिका यांचेकडे माहिती सादर केल्यानंतर पुणे महानगरपालिकेकडुन दिनांक ०५.०७.२०११ रोजी त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. भोगवटा पत्र देण्याकरीता सदर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर ना हरकत प्रमाणपत्रामध्ये सदर ८ झाडांचे वय व वर्णन नमूद केलेले आहे. दिनांक ३१.०३.२०२२ रोजी सदर घटना ठिकाणाचा बँकेस ताबा दिला व त्या दिवसापर्यंत सदरची झाडे व्यवस्थीतपणे अस्तित्वात होती.

**१२.** सदर साक्षीदार पुढे कथन करतात की, सदर घटना ठिकाणाचा बँकेने लिलाव केल्यानंतर सदर जागेमध्ये लावलेली झाडे ही बेकायदेशीरपणे काढुन

टाकल्याचे निदर्शनास आले त्यामुळे पुणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक १९.०४.२०२३ रोजी निशाणी १३ वरील तक्रारी अर्ज दिला होता. सदर जागेमध्ये आरोपी यांनी अनाधिकृत बांधकाम करून अनाधिकृतपणे सदर झाडांची तोड केलेली आहे व त्याबाबतचे फोटो देखील त्यांनी सादर केलेले आहेत. सदर वृक्षतोड केली असल्याने बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांनी दिनांक ११.०३.२०२५ रोजी भोगवटा पत्र रद्द करण्याबाबत बांधकाम विभाग, झोन क्र.५ यांना कळविले होते. सदर जागेमध्ये त्यांनी लावलेल्या वृक्षांची तोडीबाबत तक्रारी अर्ज दिल्यानंतर पुणे महानगरपालिकेतर्फे सदर ठिकाणी घटनास्थळ पंचनामा निशाणी १४ करण्यात आला व त्यावर पंच म्हणुन त्यांनी सही केली. पंचनाम्यामध्ये नमुद केलेल्या झाडांव्यतिरीक्त अनेक औषधी झाडे सदर जागेत होती ती झाडे देखील विनापरवाना काढून टाकण्यात आली होती व त्याबाबत मार्केटयार्ड पोलीस स्टेशन यांचेकडे देखील दिनांक २५.०८.२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.

**१३.** फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, तक्रारी अर्ज निशाणी १३ व पंचनामा निशाणी १४ मध्ये सदरची वृक्षतोड कधी व कशाप्रकारे केली त्याबाबतची तारीख व वेळ याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. तसेच सदर वृक्षतोड झाल्यानंतर त्या ठिकाणी असलेल्या लाकुडफाटा कशाप्रकारे त्या ठिकाणाहुन नेण्यात आले हे त्यांनी पाहिलेले नाही. पंचनामा निशाणी २४ मध्ये सदर ठिकाणी झाडेच अस्तीत्वात नसल्याने त्या वृक्षांचे वय व वर्णन पंचनाम्यामध्ये दिनांक ०५.०७.२०११ उद्यान विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र प्रमाणेच लिहिण्यात आलेले होते. सदर साक्षीदार पुढे असे देखील मान्य करतात की, फिर्याद सोबत दाखल केलेले फोटो हे त्यांनी त्यांच्याच मोबाईलमध्ये काढलेले होते.

**१४.** फिर्यादी पुणे महानगरपालिका तर्फे विधीज्ञ श्रीमती अनुराधा पडवळ, मुळ तक्रारदार श्री. सनिल शहा यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. एच. व्ही. सुबेदार व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. क्षीरसागर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**१५.** फिर्यादी व मुळ तक्रारदार तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, मुळ तक्रारदार श्री. सुनिल शहा यांनी दिनांक १७.०४.२०२३ रोजी अनाधिकृत बांधकाम व अनाधिकृत वृक्षतोडीबाबत पुणे महानगरपालिकेकडे आरोपी विरूद्ध अर्ज सादर केला होता. त्यावरुन पुणे महानगरपालिकेतर्फे हॉर्ट्रीकल्चर मिस्त्री श्री. बाळासाहेब डोळस यांनी दिनांक २४.०४.२०२३ रोजी घटना ठिकाणी जाऊन घटनास्थळ पंचनामा निशाणी १४ तयार केला. पंचनाम्यावरून असे स्पष्ट होत आहे की, सदर जागेवर पुर्वी अस्तीत्वात असलेली झाडे सद्यःस्थीतीत अस्तित्वात नव्हती. त्याप्रमाणे सविस्तर अहवाल सादर करण्यात आला व तो वृक्ष अधिकारी बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे सादर करण्यात आला. वृक्ष अधिकारी यांनी आरोपी यांना दिनांक २८.०४.२०२३ रोजी आठ दिवसात खुलासा सादर करण्याबाबत नोटीस निशाणी १६ दिली. परंतु आरोपी यांनी सदर नोटीसला उत्तर दिले नाही. यावरून आरोपी यांनी बेकायदेशीर कृत्य केल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक ०२.०६.२०२३ रोजी वृक्ष अधिकारी यांनी आरोपी यांना पहिल्या नोटीसला उत्तर दिले नाही म्हणून दुसरी नोटीस दिली. त्यानंतर आरोपी यांच्याविरूद्ध प्रस्तुतचा खटला सादर करण्यात आला व त्यानंतर आरोपी यांनी निशाणी १७ वरील खुलासा सादर केला.

**१६.** फिर्यादी व मुळ तक्रारदार यांच्यातर्फे विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, मुळ तक्रारदार यांनी अभिलेखावर उद्यान विभाग पुणे महानगरपालिका यांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामध्ये अस्तीत्वात असलेल्या झाडांचा

उल्लेख करण्यात आलेला होता. तसेच दिनांक २८.०६.२०११ रोजी मुळ तक्रारदार यांनी उद्यान विभाग यांच्याकडे हमीपत्र निशाणी २३ देखील सादर केलेले होते. त्यावरून सदरचे झाडे अस्तीत्वात होती आणि पंचनामा प्रमाणे सदरच्या झाडांची सद्यःस्तीतीत तोड करण्यात आली होती असे स्पष्ट होते. बांधकाम विभाग पुणे महानगरपालिका यांनी देखील आरोपी यांना दिनांक १८.०४.२०२३ रोजी अनाधिकृत बांधकामाबाबत नोटीस दिली होती. यावरून असे स्पष्ट होते की, आरोपी यांनी विनापरवाना बांधकाम केलेले आहे व विनापरवाना झाडे देखील तोडलेली आहेत. सदरची मिळकत ही मुळ तक्रारदार यांच्या मालकीची होती. त्यांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही म्हणुन बँकेने सदरची मिळकत/बंगलो जप्त करून त्याचा लिलाव केला. सदर लिलावामध्ये आरोपी यांनी ती मिळकत/बंगलो हा खरेदी करून घेतला. आरोपी यांना सदर मिळकतीबाबत आवश्यक ते कागदपत्र दाखवण्यात आले होते. जर ना हरकत प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली झाडे अस्तीत्वात नव्हती तर मग आरोपी यांनी योग्य वेळी वृक्ष प्राधिकरण यांचेकडे तक्रारी अर्ज का दिला नाही? आरोपी यांनी सदर तक्रारी अर्ज दिला नाही तसेच वृक्ष अधिकारी यांनी पाठविलेल्या नोटीसला उत्तर देखील दिले नाही त्यामुळे फिर्याद मध्ये नमुद असलेला गुन्हा आरोपी यांनी केलेला आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट पिटीशन नंबर ३७५२/२०२१ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे मानवी आयुष्यात झाडांचे महत्व याबाबत निर्देशिक तत्व दिलेले आहेत. सदरचा न्यायनिवाडा हा प्रस्तुत खटल्यामध्ये तंतोतंत लागु होतो. प्रत्येक गुन्ह्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/पुरावा आवश्यक नसतो. आरोपी यांनी विनापरवाना वृक्षतोड केलेली आहे हे पुर्णपणे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे आरोपी यांना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी.

**१७.** आरोपी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा खटला वृक्ष

संवर्धन व संरक्षण अधिनियम १९७५ अन्वये दाखल केला आहे. सदर खटला परिस्थीती जन्य पुराव्यावर आधारीत आहे. त्यामुळे सर्व पुराव्यांची जोडणी घट्ट बांधणीची जबाबदारी सरकारी पक्षावर आहे. सरकार पक्षाचा संपुर्ण पुरावा हा सुसंगत व परस्परांना अनुकूल असला पाहिजे. जर साक्षीदारांचे पुरावे भिन्न असतील, पुराव्यामध्ये विसंगती असेल तर असा पुरावा परिस्थीतीजन्य पुराव्याची बांधणी करू शकणार नाही. साक्षीदार क्र.२ यांनी प्रस्तुत प्रकरणात दिलेली तोंडी साक्ष व दाखल केलेला पुरावा हे पुर्णतः परस्पर विरोधी आहेत. पंचनामा निशाणी १४ मध्ये पाच वृक्षांची कथीत वृक्षतोड झाल्याबाबत उल्लेख आहे परंतु कथीत वृक्षतोड नेमकी कधी झाली त्याची तारीख व वेळ याबाबत पंचनाम्यात कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही व तसा पुरावा देखील मा. न्यायालयासमोर आलेला नाही. मुळ तक्रारदार श्री. सुनिल शहा यांचेकडून घटनास्थळ बंगला जप्त केल्यानंतर सदर घटनास्थळ बंगला काही काळ बँकेच्या ताब्यात होता. आरोपी यांना सदर बंगल्याचे मालकी हक्क व ताबा बँकेच्या लिलावाद्वारे नंतर प्राप्त झालेला आहे. त्यापुर्वीच घटनास्थळावरील झाडे, झुडपे व बगीचा याचे मोठया प्रमाणावर नासधूस व नुकसान झालेले होते.

१८. आरोपी तर्फे विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, कथीत वृक्षतोड कोणत्या हत्याराने केली? कधी केली? किती लाकुडफाटा जप्त करण्यात आला? याबाबत पंचनाम्यामध्ये तसेच अलवाल निशाणी १५ मध्येही कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही अथवा ते जप्त ही करण्यात आलेले नाही. तसेच कथीत वृक्षतोड कशाच्या आधारे केली गेली असावी? कुऱ्हाड, करवत, किंवा विद्युत ब्लेड याबाबत फिर्यादी यांनी कोणताही तपास केल्याचा उल्लेख मा. न्यायालयात दाखल पुराव्यांमध्ये नाही. पंचनाम्यातील झाडांचे तपशील हे सन २०११ साली प्रस्तुत घटनास्थळाचे मालक व खटल्यातील पंच क्रमांक १ श्री. सुनिल शहा यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात

आलेल्या ना हरकत प्रमाणपत्रातील निशाणी २४ नोंदीद्वारे नोंदविण्यात आलेले आहे. साक्षीदार क्र. १ हे देखील सदरची बाब मान्य करतात. कथीत वृक्षांचे तपशील हे नमूद अभिलेखाच्या आधारे जसेच्या तसे पंचनाम्यात नोंदविलेले आहेत. प्रस्तुत खटल्यात कथीत घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा घटनास्थळाच्या आजुबाजूला असणाऱ्या लोकांचा जबाब नोंदविण्यात आलेला नाही. सदर वृक्षांची तोड ही घटनास्थळावरील जागा/बंगला याची मालकी आरोपी यांच्याकडे आल्यानंतर झाली का याबाबत देखील कोणताही ठोस पुरावा मा. न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेला नाही. फौजदारी खटल्यात पंच हा इसम त्रयस्त, स्वतंत्र व निःपक्षपातील भुमीकेत असणे गरजेचे असते. याचा थेट परिणाम खटल्याच्या गुणवत्तेवर होत असतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये मुळ तक्रारदार व घटनास्थळाचे पुर्वीचे मालक श्री. सुनिल शहा हेच पंच साक्षीदार आहेत. त्यामुळे सदरची व्यक्ती पंच म्हणुन निःपक्ष काम करू शकत नाही. घटनास्थळाच्या मालकी हक्काबाबत मुळ तक्रारदार व आरोपी यांच्यामध्ये दिवाणी वाद चालू आहेत. निशाणी १६ व १७ वरील नोटीस फिर्यादी यांनी आरोपी यांना पाठविलेबाबत व ती नोटीस आरोपी यांना प्राप्त झालेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा फिर्यादी यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे कथीत वृक्षतोड आरोपी यांनी केलेबाबत सबळ पुरावा मा. न्यायालयासमोर आलेला नाही. सबब, आरोपी यांना निर्दोश मुक्त करण्यात यावे.

**१९.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्धतेकामी फिर्यादी पक्षातर्फे फिर्यादी व मुळ तक्रारदार यांची साक्ष अभिपटलावर नोंदवण्यात आली आहे. फिर्यादी पक्षातर्फे तोंडी आणि लेखी पुराव्यांचे अवलोकन केले. फिर्यादीने अनाधिकृत वृक्षतोडीची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळावर जावुन पाहणी केली आणि त्याबाबतचा सविस्तर पंचनाम्यासहित

अहवाल (नि.क्र.१५) कार्यालयात सादर केला.

२०. फिर्यादी पक्षातर्फे संबंधीत विभागाचे हॉर्ट्री मिस्त्री श्री. बाळासाहेब कुशाबा डोळस यांची साक्ष नोंदवण्यात आली. आरोपीस वृक्षतोड करताना फिर्यादी अगर मुळ तक्रारदार अगर घटना ठिकाणाच्या आजुबाजूला राहणारे नागरीक यांनी स्वतः पाहिलेले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळावरील एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब नोंदविला गेलेला नाही अथवा घटनास्थळाच्या आजुबाजूला राहणाऱ्या व्यक्तींचा जबाब देखील नोंदविला गेलेला नाही. फिर्यादी तसेच मुळ तक्रारदार त्यांच्या पुराव्यामध्ये मान्य करतात की, फिर्यादमध्ये, नमूद केलेले वृक्षांचे वर्णन व वय हे दिनांक ०५.०७.२०११ रोजी उद्यान विभाग यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणापत्र प्रमाणे जसेच्या तसे लिहिण्यात आलेले आहे. घटनास्थळ बंगला हा बँकेने जप्त केला होता व तो जप्त केल्यानंतर लगेचच लिलाव करून तो आरोपी यांच्या ताब्यात देण्यात आलेला नव्हता हे देखील मान्य करण्यात आलेले आहे. त्यामुळे आरोपी यांना सदर जागेचा/बंगल्याचा ताबा मिळण्यापुर्वी कथीत वृक्षांची तोड झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

२१. मुळ तक्रारदार साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपी यांनी सदर बंगल्यामध्ये अनाधिकृत बांधकाम केले असल्याने त्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे नोटीस देण्यात आली होती व त्याबाबत दिवाणी दावा प्रलंबीत असल्याचे कथन केलेले आहे. परंतु आरोपी यांना जरी अनाधिकृत बांधकामाबाबत नोटीस देण्यात आली असलीतरी त्यांनीच फिर्याद मध्ये नमूद केलेल्या वृक्षांची विनापरवाना तोड केली असे निष्कर्ष देणे योग्य होणार नाही. मुळ तक्रारदार साक्षीदार क्र.२ त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये त्यांनी घटनास्थळावरील बंगल्याचा ताबा दिनांक ३१.०३.२०२२ रोजी फेडरल बँकेकडे दिला होता असे कथन केलेले आहे. त्यानंतर सुमारे १ वर्षांनी दिनांक

२४.०४.२०२३ रोजी घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. सदरच्या एक वर्ष कालावधीमध्ये कथीत वृक्षांची स्थिती कशी होती याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. सदरची वृक्षतोड करीत असतानाचा एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नाही. प्रस्तुत खटल्यामधील सर्व तोंडी पुरावे हे परिस्थीती जन्य पुराव्यांवर अवलंबून आहेत. सबब, आरोपी यांना संशयाचा फायदा देणे उचित ठरेल. त्यामुळे आरोपीने फिर्यादमध्ये नमूद वृक्षांची तोड केली ही बाब फिर्यादीपक्षाने संशयाच्या पलिकडे सिध्द केलेली नाही. करिता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**मुद्दा क्रमांक २ करिता –**

**२२.** फिर्यादी पक्षाने कथित वेळी व स्थळी वृक्षतोड झाल्याची घटना सिध्द केली नाही. त्यामुळे सबब, आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र ठरतात, करिता न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

## :: आदेश ::

१. आरोपी **श्री. सचिन विनोद गांधी** यांना **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८** (फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१)) नुसार त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या **महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा जामिन बंधपत्र किंवा जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये, पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SAYYAD NAJMEEN SALIMSHA

Digitally signed by SAYYAD NAJMEEN SALIMSHA
Date: 2026.07.09 17:40:53 +0530

स्थळः पुणे

दिनांकः ०९/०७/२०२६.

**(श्रीमती एन. एस. सय्यद)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

(मनपा न्यायालय, पुणे), जि. पुणे.

## प्रमाणपत्र

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| कोर्टाचे नांव | : | **श्रीमती एन. एस. सय्यद,**<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (मनपा न्यायालय),<br>जि. पुणे |
| लघुलेखकाचे नांव | : | श्री. सुनिल गुलाब सुर्यवंशी |
| निकाल दि. | : | ०९.०७.२०२६ |
| सही केलेची दि. | : | ०९.०७.२०२६ |
| अपलोड केलेची दि. | : | ०९.०७.२०२६ |